ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज™

# मणिपूरमधून शेकडो 'बने मेनाशे' जमातीचे लोक विमानाने इस्रायलला रवाना





पान 2 वरुन...

अल्पवयीनांमधील व्यसनाधिनता रोखण्याचे आव्हान

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 25 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ७ खासदार भाजपात.. ऑपरेशन लोटस'वर केजरीवाल यांचा संताप

# आम आदमी पार्टीला मोठा धक्का..!



**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पंजाब आणि गुजरात विधानसभा निवडणुकीचे वेध लागलेले असतानाच आम आदमी पक्षाला मोठा झटका बसला आहे. राघव चड्डा यांच्यासह आपच्या सात खासदारांनी भाजपामध्ये प्रवेश केला. भाजपाच्या 'ऑपरेशन लोटस'वर आपचे नेते आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी संताप व्यक्त केला. ते म्हणाले की, हा भाजपाने पंजाबच्या लोकांना धक्का दिला आहे.**

'आप'ने राज्यसभेत उप गटनेते असलेल्या खासदार राघव चड्डा यांना पदावरून हटवले. त्यानंतर अशोक मित्तल यांची या पदी नियुक्ती केली. त्यानंतर महिनाभरातच भाजपाने आपला मोठा तडाखा दिला आहे. खासदार राघव चड्डा यांनी दोन खासदारांसह पत्रकार परिषद घेत दोन तृतीयांश गट फुटून भाजपामध्ये विलीन होत असल्याचे जाहीर केले.

### आम आदमी पार्टीची पहिली प्रतिक्रिया

राघव चड्डा यांनी आम आदमी पक्ष सोडून 7 राज्यसभा खासदारांसह भाजपमध्ये प्रवेश करण्याची घोषणा केल्यानंतर, आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंह यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी या घटनेला भाजपचे ऑपरेशन लोटस आणि अत्यंत घाणेरड्या राजकारणाचा खेळ असल्याचे म्हटले. संजय सिंह म्हणाले की,'आज भाजपने आम आदमी पक्षाचे 7 राज्यसभा खासदार फोडून घाणेरडे राजकारण केले आहे. पंजाबमधील लोक हे कधीही विसरणार नाहीत. पंजाबची जनता यांना कधीच माफ करणार नाही.





"गेल्या एका वर्षापासून मी पक्षाच्या कार्यक्रमापासून दूर होतो. तुम्ही दूर का राहताय, असे मला विचारले जायचे. मी सर्वकाही सुरळीत होईल, यासाठी वाट पाहात होतो. परंतु आज मी तुम्हाला खरे कारण सांगतो. आम आदमी पार्टीच्या गुन्ह्यांमध्ये मला सामील व्हायचे नव्हते. आमच्याकडे फक्त दोन पर्याय होते. एक तर राजकारण सोडा किंवा आमच्या अनुभवाचा वापर करून काही सकारात्मक राजकारण करावे, हे दोन पर्याय होते. त्यामुळेच आम्ही आम आदमी पार्टीच्या राज्यसभेच्या दोन तृतीयांश खासदारांनी भाजपा पक्षात विलीन होण्याचा निर्णय घेण्याचा घेतला आहे.

- राघव चड्डा, राज्यसभा खासदार

"संजय सिंह यांनी म्हटले की, राघव चड्डा यांना पक्षाने खासदार आणि आमदार बनवले आणि जनतेनेही त्यांना भरभरून पाठिंबा दिला. मात्र, ते आता भाजपसोबत गेले आहेत. संदीप पाठक यांचा उल्लेख करत सिंह म्हणाले की, पक्षाने त्यांना मोठ्या जबाबदाऱ्या दिल्या आणि राज्यसभेत पाठवले. याशिवाय बलबीर सिंह, अशोक मित्तल, राजेंद्र गुप्ता, स्वाती मालीवाल आणि हरभजन सिंह यांची नावे घेत संजय सिंह यांनी म्हटले की, या सर्वांना जनतेने मोठे केले, पण आता त्यांनी त्याच जनतेचा विश्वासघात केला आहे.

- संजय सिंह, राज्यसभा खासदार, आप

### भाजपाचे मिशन गुजरात, पंजाब

२०२७ मध्ये गुजरात आणि पंजाब या दोन मोठ्या राज्यात विधानसभा निवडणूक होत आहे. गुजरातमध्ये भाजपाचे वर्चस्व कायम आहे. तर पंजाबमध्ये भाजपाकडून यावेळी सत्ता मिळवण्यासाठी प्रयत्न जोरदार प्रयत्न सुरू झाले आहे. पंजाबमध्ये काँग्रेस आणि शिरोमणी अकाली दल हे दोन्ही पक्ष इतके प्रभावी राहिलेले नाही. आप पक्ष पंजाबमध्ये सत्तेत आहे. त्यामुळे भाजपाची लढाई थेट आपसोबतच असणार आहे. त्याआधीच आपला भगदाड पडले आहे.

### भाजपामध्ये जाणारे आपचे सात खासदार कोण?

पत्रकार परिषदेनंतर खासदार राघव चड्डा, संदीप पाठक, अशोक मित्तल यांच्यासह इतरांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांची भेट घेतली. राघव चड्डा यांच्यासह खासदार स्वाती मालीवाल, खासदार हरभजन सिंग, संदीप पाठक, अशोक मित्तल, राजिंदर गुप्ता आणि विक्रमसिंग साहनी हे आपचे खासदार आता भाजपामध्ये प्रवेश करणार आहेत. त्यामुळे भाजपाची राज्यसभेतील ताकद वाढणार असून, सात खासदार कमी झाल्यामुळे 'आप'ला मोठा झटका बसला आहे.

# अल्पवयीनांमधील व्यसनाधिनता रोखण्याचे आव्हान

## पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या हस्ते ‘संयम’ अहवालाचे प्रकाशन

**महाईन्यूज । पुणे**

**‘अल्पवयीनांमधील व्यसनाधिनता रोखण्याचे प्रमुख आव्हान पोलिसांसमोर आहे. शहराच्या वस्ती भागातील मुले, तसेच उच्चभ्रू वर्गातील मुलेही व्यसनांच्या आहारी गेले आहेत, ही बाब चिंतेची आहे’, असे स्पष्ट मत पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी शुक्रवारी व्यक्त केले.**



ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्टकडून अल्पवयीनांमधील व्यसनाधिनतेबाबत ‘संयम’ अहवाल तयार करण्यात आला आहे. या अहवालाचे प्रकाशन पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ते बोलत होते. सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त संजय पाटील, उपायुक्त डॉ. सागर कवडे, ताराचंद रामनाथ ट्रस्टचे प्रमुख नंदकिशोर राठी, ज्ञानप्रबोधिनीचे अजित कानिटकर, ज्ञानप्रबोधिनी प्रज्ञा मानस संशोधिकेच्या संचालिका डॉ. अनघा लवळेकर, दर्शन मुंदडा या वेळी उपस्थित होते.

‘ अमली पदार्थांचे सेवन, मद्यप्राशनाचे परिणाम आरोग्य, कुटुंब, समाजावर होतो. अल्पवयीनांमधील व्यसनाधिनता ही चिंतेची बाब आहे. अमली पदार्थ विरोधी मोहीम पोलिसांनी हाती घेतली आहे. शाळा, महाविद्यालयात जाऊन विद्यार्थ्यांचे समुपदेशन, तसेच प्रबोधन करण्यात येत आहे. अमली पदार्थ तस्करांविरुद्ध कडक कारवाईचे आदेश शहरातील सर्व पोलीस ठाण्यांना देण्यात आले आहे.

ज्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अमली पदार्थांची विक्री होते, असे भाग निश्चित करण्यात आले आहेत. अमली पदार्थांची विक्रीचा प्रकार आढळून आल्यास केवळ विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई न करता थेट पुरवठादाराचा शोध घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कष्टकरी, धनिक कुटुंबातील मुलेही व्यसनांच्या आहारी गेली आहेत, ही चिंतेची बाब आहे’, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी नमूद केले.

‘“संयम’अहवालात जी निरीक्षणे नोंदविण्यात आली. त्यादृष्टीने उपायोजना करणे गरजेचे आहे. पुण्यात पाच लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कल्याणीनगर अपघात प्रकरणात पोलिसांनी कडक कारवाई केली. अपघात करणाऱ्या मुलाचे वडील दोन वर्ष कारागृहात होते. वाहतूक नियमभंगाचे प्रमाण युवकांमध्ये दिसून येत आहे. नियमभंगाचे प्रकार शहरातील वास्तवावर बोट ठेवतात, हे देखील विचारात घेणे गरजेचे आहे. नागरिकांनी अमली पदार्थ विरोधी मोहिमेत सहभागी व्हायला पाहिजे. अमली पदार्थ विक्रीचे प्रकार आढळून आल्यास त्वरीत पोलिसांना माहिती देणे गरजेचे आहे,’ असे त्यांनी सांगितले.

नंदकिशोर राठी म्हणाले, ‘गेल्या सात ते आठ वर्षांपासून व्यसनाधिनता वाढत चालली आहे. बदलती जीवनशैली, भावनिक अस्थिरता, व्यसनांचे आकर्षण, खोट्या प्रतिष्ठेमुळे व्यसनाधिनता वाढत चालली आहे. ज्ञानप्रबोधिनीच्या मदतीने शहरातील दोन हजारजणांशी संवाद साधण्यात आला. संयम अहवाल ही केवळ आकडेवारी नसून, वास्तवावर बोट ठेवणारा आहे. या अहवालाच्या माध्यमातून आवश्यक त्या उपायोजना करणे गरजेचे आहे’.

‘१३ ते २२ वयोगटातील मुलांची व्यवसानिधनता या विषयावर अभ्यास करण्यात आला आहे. १३ ते १८ वयोगटातील मुले, युवक त्वरीत व्यवसनांच्या आहारी जातात, असे दिसून आले आहे. कुतूहलातून व्यसनांना सुरुवात होते. एनजी ड्रिंकच्या नावाखाली मुलांच्या आरोग्यावरप परिणाम होतो. मुलांच्या भवतालच्या वातावरणाचा परिणाम होतो. मुले समाज माध्यमात गुरफटत चालली आहेत. त्यादृष्टीने दीर्घकालीन उपायोजनांसह वेळोवेळी समुपदेशन, जागरुकता निर्माण करणे गरजेचे आहे’, असे डॉ. अनघा लवळेकर यांनी सांगितले. सुजाता दिवाण यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सागर कवडे यांनी आभारप्रदर्शन केले.

# शनिवार पेठेला डेक्कन परिसराशी जोडणाऱ्या सेतूचा सुवर्णमहोत्सव

**महाईन्यूज । पुणे**

**ओंकारेश्वर मंदिर आणि बालगंधर्व रंगमंदिर ही प्रमुख स्थाने असली तरी जंगली महाराज व डेक्कन जिमखाना आणि मध्यवर्ती शनिवार पेठेला जोडणारा ‘महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पूल’ वाहतुकीसाठी खुला झाला त्यास शुक्रवारी पन्नास वर्षे पूर्ण झाली. मुठेच्या काठावर अनेक पूल असले तरी नागरिकांच्या सर्वाधिक वापराचा, अशी ख्याती या पुलाने प्राप्त केली आहे.**




ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शंकरराव खरात यांच्या हस्ते २४ एप्रिल १९७६ या पुलाचे उदघाटन झाले होते. तत्कालीन महापौर वसंतराव थोरात आणि महापालिका आयुक्त रा. ग. गुप्ते उपस्थित होते. २३ एप्रिल १८७३ हा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्मदिन. अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय ठेवून कार्यरत असलेले शिंदे हे व्यासंगी समाजसेवक होते.

पुलाचे भूमिपूजन १९७१ मध्ये झाले. त्यानंतर पाच वर्षांनी पूल प्रत्यक्ष वापरात आला. त्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज पूल आणि लकडी पूल (छत्रपती संभाजी महाराज पूल) याच पुलांवर मध्यवस्तीतील पुणेकरांची वर्दळ असे. शिवाजीनगर गावठाण, मॉडर्न परिसर, वडारवाडी, गोखलेनगर अशा भागातील नागरिकांना शनिवार, सदाशिव पेठेत जाण्यासाठी दूर लकडी पुलावरून वळसा घेऊन जावे लागे किंवा छत्रपती शिवाजी महाराज पुलावरून शनिवारवाड्यालगतच्या रस्त्यांनी तर शनिवार, नारायण पेठेतून आलेल्या वाहनचालकांनाही छत्रपती शिवाजी महाराज पुलावरून जिल्हा न्यायालयाच्या किंवा महापालिका भवनाच्या दिशेने जावे लागे. दोन्ही पुलांच्या दरम्यान महर्षी शिंदे पूल झाल्याने वाहनचालकांची मोठी सोय झाली. शनिवार पेठेत जाण्यासाठी अण्णासाहेब पटवर्धन समाधीजवळ कॉजवे होता; मात्र त्याला मर्यादा होत्या. पादचाऱ्यांनाच त्याचा वापर करता येई. (आता तोही पाडला आहे) दरम्यान नदीकाठचा रस्त्याही झाला. पूलावरुन गेलेल्या मेट्रो मार्गावरील धावत्या मेट्रोतूनही पूल आकर्षक दिसतो, अशी माहिती संदर्भ ग्रंथपाल प्रसाद भडसावळे यांनी दिली.

उन्हाळ्याच्या दिवसांत या पुलावर हवेच्या मंद झुळकेचा आनंद घेत वेगवेगळ्या वयोगटांचे लोक बसत. हळूहळू पुलाला चौपाटीचे स्वरूप आले. दुतर्फा पसरलेले नदीचे विस्तीर्ण खोरे, शांत वातावरण आणि मंद वाहणारे वारे हे या पुलाचे चार दशकांपूर्वी खास ‘वैशिष्ट्य होते.

पुलाजवळील ओंकारेश्वराचे पुरातन देवालय तर पुलाच्या दोन्ही बाजूंना असलेल्या पदपथाच्या आयताकृती दगडांमुळे पुलावर बसण्याची पुणेकरांसाठी आयतीच सोय झाली होती. लहान मुलेही बिनधास्त पदपथांवर बागडत असत. तरुणांची रेलचेल असे. कौटुंबिक निवांतपणा मिळवून देणारा मध्यवस्तीतील हा महत्त्वाचा एकमेव पूल बनला होता.

या पुलाला ‘बालगंधर्व पूल’ असेच सर्रास संबोधले जाते. बालगंधर्व रंगमंदिराच्या उदघाटन प्रसंगी केलेल्या भाषणात महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांनी, ‘मुठेच्या काठावरील ओंकारेश्वर आणि बालगंधर्व रंगमंदिराच्या रूपातील नटेश्वर यांचा संगम होण्यासाठी येथे एखादा पूल बांधला जावा.....’ अशा आशयाचे वक्तव्य केले होते. मुठेला आलेला पूर पाहण्यासाठी ही या पुलावर दर वर्षी गर्दी होत असते, याकडे भडसावळे यांनी लक्ष वेधले.

### पुलाची सद्यस्थिती

पुणेकरांच्या जिव्हाळ्याच्या महर्षी शिंदे पुलाची आता पन्नास वर्षांनंतर झालेली दुरावस्था मात्र पहावत नाही. नागरिकांना बसण्याची सोय तर सोडाच; परंतु पुलाच्या दोन्ही बाजूला निर्माल्याचा कचरा पडलेला असतो. त्याची दुर्गंधीही अस्वस्थ करते. तसेच दुतर्फा चार चाकी वाहने लावण्याची हक्काची जागा म्हणूनच वापर होत असल्याने पुलाची पूर्वीची शोभा पूर्णपणे निघून गेली आहे. या पुलाने अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे प्रणेते डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची अज्ञात मारेकऱ्यांनी केलेली निघृण हत्या पाहिली. अत्यंत अस्वस्थ करणारा हा प्रसंग होता. गेल्या पन्नास वर्षांमध्ये अनेक महत्त्वाच्या घटनांचा साक्षीदार असलेला हा पूल पुणेकरांच्या जिव्हाळ्याचा एक विषय आहे.

# ११२ कोटी खर्चून केलेल्या यंत्रणेत ‘व्हायरस’

## सतत बिघाडामुळे कामकाज ठप्प; सर्व्हर डाऊनमुळे प्रशासकीय फाईली रखडल्या

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने ११२ कोटी रुपये खर्च करून सुरू केलेल्या दस्तऐवज व्यवस्थापन प्रणालीमध्ये (डीएमएस) सातत्याने बिघाड होत असून, प्रशासकीय कामकाज संथ गतीने होत आहे. त्यामुळे महापालिकेत नस्ती (फाइल) आदेशात पुन्हा मनुष्यबळाच गुंतत आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने एप्रिल २०२५ पासून कागदविरहित प्रशासनाकडे वाटचाल सुरू केली. प्रशासनात पारदर्शकता व गतिमानता यावी, यासाठी दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली (डीएमएस) आणि कार्यप्रवाह प्रणाली (डब्ल्यूएफ) विकसित केली. यासाठी पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडने जीआयएस एनेबल ईआरपी प्रकल्पांतर्गत ३३ संगणक प्रणाली विकसित केल्या आहेत. त्यानुसार, ३३ विभागांचे सर्व कामकाज ऑनलाइन माध्यमातून सुरू झाले.

महापालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेतन व ठेकेदारांची देयके काढण्यासाठी ‘सॅप’ प्रणालीचा वापर केला जातो. विभागप्रमुख, वरिष्ठ अधिकारी, प्रशासन अधिकारी, शाखाप्रमुख, लिपिक यांना प्रशासकीय कामकाजासाठी ‘डिजिटल कोड’ देण्यात आले. एक हजार ७०९ डिजिटल स्वाक्षरी ‘की’ तयार करण्यात आल्या. या संपूर्ण प्रणालीवर ११२ कोटींचा खर्च करण्यात आला. एका वर्षानंतरही या दस्तऐवज व्यवस्थापन प्रणालीत वारंवार व्यत्यय येत आहे. तांत्रिक अडचणी येत असून, इंटरनेट आणि वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर नव्याने सर्व प्रक्रिया करावी लागते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ‘प्रणालीत अनेक त्रुटी आहेत. प्रत्येक नस्तीसाठी विलंब लागतो. महापालिकेच्या सर्व प्रकारच्या नस्ती तयार करण्यासाठी दस्तऐवज व्यवस्थापन आणि कार्यप्रवाह प्रणालीचा वापर केला जात आहे. या प्रणालीचा वापर करून सर्व कागदपत्रांचे स्कॅनिंग, ट्रॅकिंग, सामायीकरण व शोध घेण्यास विलंब होत आहे. प्रशासनाचे कामकाज पूर्णतः डिजिटल झाले असले, तरीही या प्रणालीत वारंवार व्यत्यय येत आहे. गेल्या काही दिवसांपासून पाचपैकी तीन सर्व्हर बंद आहेत. त्यामुळे दररोज दुपारनंतर प्रणाली बंद होत आहे,’ असे अधिकाऱ्यांनी नमूद केले. डीएमएस प्रणालीसाठी पाच सर्व्हर आहेत. त्यापैकी तीन बंद आहेत. त्यामुळे काही प्रमाणात कामकाज संथ गतीने सुरू आहे. लवकरात लवकर सर्व्हर सुरू करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे पिंपरी-चिंचवड महापालिका माहिती तंत्रज्ञान विभागाचे सहायक आयुक्त अमित पंडित यांनी सांगितले.

### डीएमएस प्रणाली ठप्प

महापालिकेच्या ११२ कोटींच्या डीएमएस प्रणालीत वारंवार बिघाड होत असून, सर्व्हर बंद पडल्याने प्रशासकीय फाईलींची प्रक्रिया रखडत आहे. तांत्रिक अडचणींमुळे कामकाज संथ गतीने सुरू असून, अधिकारी-कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# पीसीएमसी मेट्रो ते काळेवाडी फाटा फिडर बस सुरू

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. (पीएमपीएमएल) यांच्या वतीने पीसीएमसी मेट्रो स्थानक ते काळेवाडी फाटादरम्यान मेट्रो फिडर बससेवा सुरू करण्यात आली आहे. पीसीएमसी मेट्रो स्थानक ते काळेवाडी फाटा यादरम्यान ही बस धावणार आहे. मेट्रो फिडर बसमार्ग क्र. 31 मुळे काळेवाडी, रहाटणी आणि पिंपरी परिसरातील हजारो नागरिकांना दिलासा मिळाला आहे.**

### बस मार्ग

ही बससेवा दोन्ही दिशांनी वर्तुळाकार धावणार आहे. पीसीएमसी मेट्रो स्थानक-कुंदन हॉटेल, गोकुळ हॉटेल, शगुन चौक, जिजामाता रुग्णालय, लकी बेकरी, विजय नगर, अविनाश मंगल कार्यालय, एम.एम. शाळा, तापकीर नगर, धनगरबाबा काळेवाडी, श्रीनगर आणि रहाटणी फाटा. काळेवाडी फाटा - रहाटणी फाटा, श्रीनगर, तापकीर नगर, एम. एम. शाळा, अविनाश मंगल कार्यालय, लकी बेकरी, जिजामाता रुग्णालय, कराची चौक, लाल मंदिर, भाटनगर आणि मोरवाडी चौक.





विशेष म्हणजे, पुणे मेट्रोच्या प्रवाशांच्या सुविधेसाठी एकूण 10 मेट्रो स्थानकांवरून 23 मार्गांवर 83 फिडर बससुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होत आहे. या नवीन बस मार्गामुळे काळेवाडी, रहाटणी, विजयनगर, तापकीरनगर, श्रीनगर, धनगरबाबावस्ती, आणि ज्योतिबानगर यांसारख्या दाट लोकवस्तीच्या भागांना थेट मेट्रो जोडणी मिळाली आहे. येथील नागरिकांचा आता अवघ्या 10 ते 20 रुपयांत हा प्रवास पूर्ण होणार आहे.

### ..अशी असेल वेळ

सकाळी 6:30 पासून सेवा उपलब्ध. मेट्रो शटल मार्ग क्रमांक 31 (पीसीएमसी मेट्रो स्थानक ते काळेवाडी फाटा) ही बस गर्दीच्या वेळी दर 15 मिनिटांनी आणि कमी गर्दीच्या वेळी दर 30 मिनिटांनी उपलब्ध असेल.




पहिली बस : सकाळी 6:30 वाजता पीसीएमसी मेट्रो स्थानकावरून आणि सकाळी 7 वाजता काळेवाडी फाटा येथून सुटेल. शेवटची बस : रात्री 9 वाजता पीसीएमसीवरून आणि रात्री 9:30 वाजता काळेवाडी फाटा येथून सुटेल.

# मणिपूरची जळती वेदना : राज्य-केंद्र अपयशाचा धडा



भूमिका




**मणिपूरमध्ये उसळलेला वांशिक तणाव हा केवळ एका राज्यापुरता मर्यादित प्रश्न नाही; तो भारतीय लोकशाहीच्या उत्तरदायित्वाची कठोर परीक्षा आहे. वांशिक विद्वेष आणि संभाव्य वंशच्छेद रोखणे हे कोणत्याही सरकारचे मूलभूत कर्तव्य आहे.**

परंतु मणिपूरच्या बाबतीत राज्य आणि केंद्र या दोन्ही स्तरांवर ते प्रभावीपणे पार पाडले गेले नाही, ही चिंताजनक बाब आहे. गेल्या काही दिवसांत पुन्हा उसळलेल्या हिंसाचारात निष्पाप जीव गेले. एका सैनिकाच्या कुटुंबावर झालेल्या बॉम्बहल्ल्याने परिस्थिती अधिक चिघळली. या घटनेनंतर मैतेई आणि कुकी समाजांतील अविश्वास अधिकच वाढला. त्यात नागा समाजही ओढला गेल्याने संघर्षाचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे.

या सर्व घटनांतून एक गोष्ट स्पष्ट दिसते—समाजांमधील तणाव केवळ स्वाभाविक नाही, तर तो अनेकदा गैरसमज, अफवा आणि राजकीय दुर्लक्ष यामुळे भडकतो. मणिपूरची भौगोलिक आणि सामाजिक रचना ही आधीच संवेदनशील आहे. मैतेई समाज प्रामुख्याने खोऱ्यात, तर कुकी आणि नागा समाज डोंगराळ भागात राहतात. या विभागणीमुळे परस्परांतील संवाद मर्यादित राहतो.

त्यामुळे एखादी घटना घडली की तिचा अर्थ लावण्यात विकृती येण्याची शक्यता अधिक असते. अशा वेळी सरकारने त्वरित, निष्पक्ष आणि ठोस पावले उचलणे अत्यावश्यक असते. दुर्दैवाने, तेच सर्वाधिक कमी पडले. राज्य नेतृत्वाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. सामाजिक सलोखा राखण्याऐवजी काही निर्णय आणि विधाने यांनी दुभंग अधिकच वाढवला. मैतेई समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याच्या हालचालींनी कुकी समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण केली. अशा संवेदनशील मुद्द्यांवर व्यापक संवाद आणि विश्वासार्ह प्रक्रिया आवश्यक असताना, ती दिसून आली नाही.

केंद्र सरकारची भूमिकाही तितकीच महत्त्वाची ठरते. सीमावर्ती आणि अस्थिर शेजारी देशाशी लागून असलेल्या राज्यात दीर्घकाळ अस्थिरता राहणे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही धोकादायक आहे. त्यामुळे केवळ प्रशासकीय बदल किंवा भेटीगाठी पुरेशा ठरत नाहीत. आवश्यक असल्यास कठोर उपाययोजना करून शांतता प्रस्थापित करणे केंद्राची जबाबदारी आहे. इतिहास सांगतो की सामाजिक दुभंग वेळेत रोखला नाही तर तो अधिक खोलवर जातो. मणिपूरमध्ये आज जे घडत आहे, ते याच धोक्याची घंटा आहे. या परिस्थितीत तटस्थ, संवेदनशील आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व अत्यंत आवश्यक आहे. समाजांमधील संवाद वाढवणे, अफवांवर नियंत्रण ठेवणे आणि कायद्याचा कठोर पण न्याय्य अंमल करणे ही काळाची गरज आहे.

मणिपूरचा प्रश्न हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा नाही, तर सामाजिक विश्वास पुनर्स्थापित करण्याचा आहे. तोपर्यंत खरी शांतता नांदणार नाही. त्यामुळे राज्य आणि केंद्र या दोघांनीही राजकारणाच्या पलीकडे जाऊन मानवतेच्या दृष्टीने निर्णय घेणे अत्यावश्यक आहे. अन्यथा हा दुभंग अधिकच वाढत जाईल आणि त्याचे परिणाम दूरगामी ठरतील.

## प्रासंगिक »

### असत्य

**एका प्रख्यात वकिलाकडे एक गरीब शेतकरी गेला. त्याची केस साधीच होती. त्यातून सुटायचे होते. पण साक्षी-पुरावे, उलट-तपासणीत त्याला बोलता आले नसते.**

गरीब, अशिक्षित शेतकरी होता तो. वकिलाने यावर तोडगा काढला. तो शेतकऱ्याला म्हणाला, "दादा ! घाबरू नका. मी सांगेन तसं करा. मी सोडवतो तुम्हाला यातून." शेतकरी खुश झाला. त्याला वकिलाने सांगितले की, 'कोणत्याही प्रश्नाला उत्तर देऊ नका. त्याऐवजी फक्त बें बे असं ओरडा.' साक्षीच्या वेळी शेतकऱ्याने तसे केले. तेव्हा वकील म्हणाला, "हा शेतकरी अशिक्षित आहे आणि थोडा वेडाही आहे." अशा प्रकारे युक्तिवाद करून त्याने ती केस जिंकली. शेतकरी खुश होऊन घरी घरी जाऊ लागला. तेव्हा वकील म्हणाला, "दादा ! तुमची केस जिंकली. नुकसंभारपाईसुद्धा मिळाली. आता माझी फी द्या." शेतकऱ्याने वकिलांकडे रोखून पाहत उत्तर दिले. "बें-बें" वकिलाच्या खोटेपणाचा उपाय त्याच्यावरच उलटला.

- तात्पर्य : भिअसत्य असे माणसावर या ना त्या रूपाने उलटले. म्हणून सत्याने वागावे.

शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी स्पष्ट कायदा अस्तित्वात असतानाही त्याची अंमलबजावणी मात्र वारंवार प्रश्नचिन्हाखाली येते. समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आंदोलनातून हा कायदा अस्तित्वात आला, पण त्याची आत्मा जपण्यात शासन यंत्रणा अपयशी ठरल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर येत आहे.

# बदल्यांचा महिना अन् 'फिल्डिंग'चा महिमा!




दरवर्षी ३१ मेपूर्वी बदल्या करणे बंधनकारक असतानाच, त्यासाठी राजकीय दबाव, शिफारसी आणि आर्थिक व्यवहारांचे सावट कायम असल्याचे वास्तव लपून राहिलेले नाही.

प्रत्यक्षात "राजकीय हस्तक्षेप होणार नाही" असे आदेश दरवर्षी दिले जातात; मात्र प्रत्यक्ष व्यवहारात आमदार, खासदार, मंत्री यांच्या सांगण्यावरूनच बदल्या होत असल्याची सर्वसाधारण धारणा आहे. परिणामी, प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये असुरक्षितता निर्माण होते, तर 'जोड' असलेल्यांना लाभ मिळतो. या प्रक्रियेत पारदर्शकतेचा पूर्णतः अभाव जाणवतो. यंदाच्या बदल्यांच्या पार्श्वभूमीवर दलालांची हालचाल वाढल्याच्या चर्चा पुन्हा ऐकू येत आहेत. मंत्रालय परिसरातील हॉटेलांमध्ये 'तोडपाणी' होणे, महसूल विभागात व्यवहारांची कुजबुज—ही सर्व लक्षणे व्यवस्थेतील खोलवरच्या आजाराचीच चिन्हे आहेत. शासनाने इच्छाशक्ती दाखवली तर गुप्तचर यंत्रणांच्या मदतीने अशा रॅकेटचा पर्दाफाश होऊ शकतो. महसूल, नगरविकास, गृह यांसारख्या महत्त्वाच्या खात्यांमध्ये बदल्यांभोवती फिरणारे अर्थकारण कोट्यवधींचे असल्याची चर्चा आहे, जी शासनाच्या प्रतिमेला तडा देणारी ठरते. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पारदर्शक बदल्यांची पद्धत आणण्याचे संकेत दिले आहेत. त्यांनी आतापर्यंत घेतलेल्या काही धडाकेबाज निर्णयांच्या पार्श्वभूमीवर या प्रक्रियेतही ठोस सुधारणा अपेक्षित आहेत. जर त्यांनी खरोखरच हस्तक्षेपमुक्त, ऑनलाइन आणि गुणांकनाधारित प्रणाली राबवली, तर तो एक सकारात्मक संदेश ठरेल.दरम्यान, बारामती पोटनिवडणुकीतील काही घडामोडींनी राजकारणातील वेगळे चित्रही दाखवले. विरोधी आणि सत्ताधारी पक्षांतील नेत्यांनी एकमेकांसाठी मते मागितली, प्रचारात संयम राखला गेला—ही बाब आशादायी आहे. मात्र, ही अपवादात्मक परिस्थिती असून, सर्वसाधारण निवडणुकांत अशी शिस्त दिसेल, ही अपेक्षा सध्या तरी अवास्तवच वाटते. एकंदरीत, बदली प्रक्रियेत पारदर्शकता आणि निवडणुकांत सुसंस्कृतपणा या दोन्ही बाबी लोकशाहीसाठी अत्यावश्यक आहेत. त्यासाठी केवळ नियम नव्हे, तर प्रामाणिक अंमलबजावणी आणि राजकीय इच्छाशक्तीही तितकीच महत्त्वाची आहे.

## ।। अभंगवाणी ।।



हातीं घेऊनियां काठी ।
तुका लागला कलेवरा पाठी ॥१॥

नेऊनि निजविलें स्मशानीं ।
माणसें जाळी ते ठाकणीं ॥धृ.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गरीब रुग्णांना आता तातडीने मदत!

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून २० गंभीर आजारांवर उपचार

**महाईन्यूज । मुंबई**

**शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी आशेचा किरण ठरत आहे. या निधीच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यात गेल्या आर्थिक वर्षात ३ हजार ८६१ रुग्णांना सुमारे ३४ कोटी ५३ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.**



मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून आर्थिक वर्षात २०२५-२६ मध्ये राज्यातील ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. त्यात पुणे जिल्ह्यातील ३ हजार ८६१ रुग्णांना सुमारे ३४ कोटी ५३ लाख ९९ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

या निधीतून २० गंभीर आजारांसाठी मदत केली जाते. त्यात कॉक्लिअर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुस, अस्थिमज्जा, हात आणि गुडघ्याचे प्रत्यारोपण, खुबा प्रत्यारोपण, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायलिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशूंचे आजार, भाजलेले रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण अशा एकूण २० आजारांचा समावेश आहे, अशी माहिती मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाने दिली आहे.

### ऑनलाइन अर्जप्रक्रिया

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचे जिल्हास्तरीय कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या कक्षांच्या माध्यमातून ऑनलाइन अर्जप्रक्रिया राबविण्यात येत असून, तातडीने अर्जांचा निपटारा केला जातो. त्यासोबतच सामंजस्य करार, निधी संकलनाच्या माध्यमातून समाजातील मदत करणारी रुग्णालये, धर्मादाय रुग्णालये, संस्था, दानशूर व्यक्तींचे सहकार्य घेतले आहे. मुख्यमंत्री सहायता निधीच्या कार्यपद्धतीत झालेल्या सुधारणांमुळे पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक साहाय्य मिळत आहे.

### बालकांवरील कर्करोग उपचारासाठी पुढाकार

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, बीपीसीएल फाउंडेशन व टाटा मेमोरिअल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत. गरजू रुग्णांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी १८००१२३२२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# पेपरफुटी प्रकरणी अखेर मुंबई विद्यापीठाकडून गुन्हा दाखल

**महाईन्यूज । मुंबई**

**वांद्रे येथील आर. डी. नॅशनल महाविद्यालयात तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या सत्र ६ परीक्षेचे तीन पेपर फुटल्याप्रकरणी एका कंत्राटी कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्याबरोबरच तीन जणांना मुंबई विद्यापीठाने कारणे दाखवा नोटीस बजावली. मात्र या प्रकरणी विद्यार्थी संघटनांनी आक्रमक भूमिका घेतल्याने गुरुवारी रात्री १०.३० वाजता अखेर मुंबई विद्यापीठाने पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या प्रकरणात विद्यापीठातील बड्या अधिकाऱ्यांऐवजी तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आल्याने नेमके कोणाला पाठीशी घालण्यात येत आहे, असा प्रश्न विद्यार्थी संघटनांनी उपस्थित केला आहे.**




मुंबई विद्यापीठामार्फत ११ ते १५ एप्रिलदरम्यान घेण्यात आलेल्या तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या सत्र ६ मधील टॅक्सेशन, इकॉनॉमिक्स आणि कॉमर्स अ‍ॅण्ड मॅनेजमेंट या विषयांची प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वीच फुटल्या. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने विशेष चौकशी समितीच्या अहवालानंतर अंतर्गत चौकशी सुरू केली होती. या प्रकरणामध्ये प्रश्नपत्रिका विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रातून (सीडीओई) फुटल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे या प्रकाराची व्याप्ती केवळ महाविद्यालयापुरती मर्यादित नसून विद्यापीठाच्या स्तरावरच गंभीर त्रुटी झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मुंबई विद्यापीठाची तृतीय वर्ष वाणिज्य शाखा सत्र ६ परीक्षेच्या तीन प्रश्नपत्रिका फुटल्याबाबत युवा सेनेने मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंना निवेदन दिल्यानंतर केलेल्या कारवाईमध्ये सीडीओई येथील अस्थायी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. त्यानंतर तीन कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली.

पेपर फुटीप्रकरणी सुरुवातील काही विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, तसेच युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यापीठ प्रशासनाची भेट घेऊन या प्रकरणात दोषी असलेल्यांविरोधा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती.

पेपर फुटीप्रकरणी सीडीओईचे संचालक किंवा मुख्य परीक्षा अधिकारी यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित होते. मात्र अस्थायी व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांवर कारवाई करून मुंबई विद्यापीठाकडून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत आहे. एखाद्या महाविद्यालयात हे प्रकरण घडले असते तर प्राचार्यांसह परीक्षा अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात आली असती. मात्र सीडीओईमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्यात येत असल्याची टीका युवा सेनेचे सिनेट सदस्य प्रदीप सावंत यांनी केली.

### विद्यापीठ प्रशासनाचे म्हणणे...

या प्रकरणी बीकेसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, संबंधित घटनेची निष्पक्ष चौकशी होऊ द्यावी, असे आवाहन मुंबई विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# इराणचा पाकिस्तानच्या सीमेवर हल्ला!

## दहशतवादी गट उद्ध्वस्त, अनेक दहशतवाद्यांना कंठस्नान घातल्याचा दावा

**महाईन्यूज । इराण**

**इराण आणि अमेरिका यांच्यात संघर्ष निवळण्यासाठी मध्यस्थी करणाऱ्या पाकिस्तानला मोठा झटका बसला आहे. इराणने पाकिस्तानी सीमेवरच हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. इराणने जैश-अल-अदल या दहशतवादी गटाचा तळ उद्ध्वस्त केल्याचा दावा करण्यात येत आहे. "इराणच्या सुरक्षा दलांनी बुधवारी जैश अल-अदल या दहशतवादी गटाचा एक कार्यरत गट उद्ध्वस्त केला", अशी माहिती तास्निम वृत्तसंस्थेने दिली आहे.**



तास्निम वृत्त संस्थेने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, "पाकिस्तानी सीमेपलीकडून आग्नेय इराणमधील सिस्तान आणि बलुचिस्तान प्रांताच्या रास्क प्रदेशात घुसखोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला. यानंतर इराणच्या सुरक्षा दलांनी बुधवारी पाकिस्तानी सीमेजवळ हल्ला करत जैश अल-अदल या दहशतवादी गटाचा एक कार्यरत गट उद्ध्वस्त केला". या हल्ल्यामध्ये अनेक दहशतवादी ठार झाल्याची माहिती तास्निम वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केलेल्या वृत्तात दिली आहे.

पाकिस्तानशी निगडीत दहशतवादी गटाचा इराणमध्ये दहशतवादी कारवाया करत असल्याचा आरोप इराणकडून करण्यात आला आहे. पाकिस्तानकडून मात्र या आरोपांचे खंडन करण्यात आले. दरम्यान, जैश -अल-जुल्म किंवा जैश-अल-अदल हा सुन्नी दहशतवाद्यांची संघटना २०१२ मध्ये स्थापन झाली आहे. हा दहशतवादी गट गेल्या काही वर्षापासून इराण-पाकिस्तान सीमेवर दहशतवादी कारवाया करत आहे. इराणी सुरक्षा दलांवर हल्ला केल्याचा अनेकवेळा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. अनेकवेळा त्यांनी देखील याची जबाबदारी स्वीकारल्याचे समोर आले आहे.

याच दहशतवादी गटाने २०१६ मध्ये भारतीय नौदल अधिकारी कुलभूषण जाधव यांचे अपहरण करुन त्यांना पाकिस्तानच्या ताब्यात दिले होते, असा आरोप इराणी अधिकाऱ्यांनी केला आहे. बंदर अब्बास येथे ही कारवाई केली होती. पाकिस्तानकडून मोठी रक्कम घेऊन जाधव यांनी पाकिस्तानच्या ताब्यात देण्यात आल्याचा आरोपही करण्यात येतो. दरम्यान, इराण आणि अमेरिका यांच्यात शांतता करार होण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या पाकिस्तानसाठी ही कारवाई मोठा धक्का मानला जात आहे.

### पाकिस्तानला झटका

दोन आठवड्यांपूर्वी इराण आणि अमेरिका यांच्या शांतता चर्चेसाठीची पहिली फेरी इस्लामाबाद येथे पार पडली होती. यानंतर दुसऱ्या फेरीकडे सर्वांचे लक्ष लागले असताना इराणने पाकिस्तानला शिष्टमंडळ पाठविण्यासाठी नकार दिला. पहिल्या फेरीत ठोस तोडगा न निघाल्याने दुसऱ्या फेरीत काहीतरी निर्णय होण्याची अपेक्षा होती. पण, आता या चर्चेवर अनिश्चिततेचे काळे ढग दाटले आहेत. दरम्यान, ट्रम्प यांनी अनिश्चितकाळासाठी इराणविरोधातील युद्धविराम वाढवला आहे.

## मणिपूरमधून शेकडो 'बने मेनाशे' जमातीचे लोक विमानाने इस्रायलला रवाना

**महाईन्यूज । मणिपूर**

**पश्चिम आशियात इस्रायल इराण आणि लेबनॉन या देशांशी लढत असतानाच त्यांनी भारतातही एक मोठी मोहीम राबवली आहे. इराणपासून ४,००० किमी दूर असलेल्या ईशान्य भारतात इस्रायल 'ऑपरेशन विंग्स ऑफ डॉन' या नावाने मोहीम राबवत आहे. मणिपूरमधील बने मेनाशे समुदायाच्या सुमारे ५,००० सदस्यांना तेल अवीव येथे स्थलांतरित करण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. इस्रायलकडून एवढी मोठी मोहीम हाती घेण्याचे कारण काय? बने मेनाशे या जमातीचा इस्रायलशी संबंध काय? बने मेनाशे म्हणजे नेमके कोण? याचा आढावा या लेखातून घेऊ.**



इंडिया टुडे या संकेतस्थळाने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. बायबलमधील श्रद्धेनुसार इस्रायलच्या हरवलेल्या १० जमातींपैकी एक असलेली बने मेनाशे जमात ईशान्य भारतातील मणिपूर राज्यात विखुरलेली आहे. मणिपूर राज्यात गेल्या दोन वर्षांपासून कुकी आणि मैतेई समुदायामध्ये मोठा हिंसाचार उसळला होता. आता एका अशांत प्रदेशातून (मणिपूर) दुसऱ्या अशांत प्रदेशात (इस्रायल) बने मेनाशे जमात प्रवास करणार आहे. हजारो वर्षांपूर्वी स्थलांतर करावे लागणाऱ्या जमातीला आता हे अखेरचे स्थलांतर करावे लागत आहे.

इस्रायली सरकारने गुरुवारी जमातीच्या २५० जणांच्या पहिल्या तुकडीला दिल्लीहून विमानाने इस्रायलला नेले. मागच्या वर्षी इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी भारतातील बने मेनाशे जमातीच्या ४,६०० सदस्यांच्या स्थलांतरासाठी निधी देण्याच्या मोहिमेची घोषणा केली होती. यापूर्वी दोन दशकांत सुमारे ५,००० लोकांनी आधीच इस्रायलमध्ये स्थलांतर केले आहे. इस्रायलचे स्थलांतर मंत्री ओफिर सोफर यांनी एएफपीशी बोलताना सांगितले की, दरवर्षी १,२०० लोकांना स्थलांतरीत करण्याची ही मोहीम आता सुरू झाली असून पुढील काही वर्षात संपूर्ण जमातीला इस्रायलमध्ये स्थलांतरित केले जाईल.

### बने मेनाशेचा अर्थ काय?

आयआयटी दिल्लीचे समाजशास्त्राचे संशोधक असफ रेंथलेई यांनी इंडिया टुडेशी बोलताना बने मेनाशे या शब्दाचा अर्थ उलगडला आणि या जमातीच्या मुळाबाबत माहिती दिली. ते म्हणाले, "बने म्हणजे मुले आणि मेनाशे म्हणजे नातू" बने मेनाशे किंवा इतर ज्यूंच्या जमाती भारतात आल्या, त्या इथे शेकडो वर्ष राहिल्या. जगातील इतर कोणत्याही देशांपेक्षा त्यांना भारतात सर्वात सुरक्षित वाटले. इतर देशांच्या तुलनेत भारतात त्यांना कधीही धार्मिक छळाचा सामना करावा लागला नाही. मणिपूरमध्ये बने मेनाशे जमातीला कुकी समाजात गणले जाते.

# पाकिस्तानात आलियाच्या नावावर स्कॅम

बॉलिवूड ब्युटी आलिया भट सध्या पाकिस्तानात चांगलीच चर्चेत आहे. मात्र, त्यामागील कारण जरा वेगळे आहे. पाकिस्तामधील वस्त्रोद्योगाच्या क्षेत्रातील प्रसिद्ध ब्रँड असलेल्या 'वजायशा ऑफिशियल'ने आलियाचे काही फोटो जाहिरात स्वरुपात पोस्ट करून वाद ओढवून घेतला आहे. आलिया या फोटोंमध्ये एथनिक कलेक्शनमध्ये दिसत आहे. पण हे कोणतेही अधिकृत शूट नाही, तर आलियाच्या जुन्या फोटोंना एआय आणि डिजिटल एडिटिंगच्या माध्यमातून ब्रँडच्या कपड्यांवर सुपरइम्पोज अर्थात पेस्ट चिकटवले केले आहे. अशाप्रकारे 'वजायशा ऑफिशियल'ने बेकायदेशीरपणे आलियाच्या एआय फोटोंच्या माध्यमातून आपल्या सिल्क कलेक्शनचे प्रमोशन केले. 'वजायशा ऑफिशियल'ने १६ एप्रिल रोजी इन्स्टाग्रामवर एक कॅरोसेल पोस्ट केली. यात आलियाला गडद लाल, टील आणि काळ्या रंगाच्या सिल्क सूटमध्ये दाखवण्यात आले होते. "आलिया भट्टलाही आमचे शीशा सिल्क कलेक्शन आवडले आहे," असे त्यात नमूद केले आहे. पण बारकाईने पाहिल्यावर हे फोटो आलियाच्या वेगवेगळ्या कार्यक्रमांमधून घेतले गेल्याचे स्पष्टपणे दिसते. विशेष म्हणजे, यात आलियाचा २०२४ चा लोरियल पॅरिस रॅम्प वॉकचा 'वेट हेअर लुक' आणि तिच्या 'सब्यसा'ची फोटोशूटमधील दागिन्यांचा वापर करण्यात आला आहे. इतकेच नाही तर यंदाच्या फेब्रुवारीतील गुची मिलान फॅशन वीकमधील तिच्या लुकलाही एडिट करण्यात आले आहे. या पोस्टवर चाहत्यांचा संताप अनावर झाला. अनेकांनी विचारले की, आलियाला याबद्दल माहिती आहे का? यावर ब्रँडने कोणत्याही भीतीशिवाय हसणाऱ्या इमोजीसह उत्तर दिले, "कृपया याला व्हायरल करा, जेणेकरून त्यांनाही कळेल." जेव्हा एका युझरने "त्या तुमच्यावर खटला दाखल करतील," अशी चेतावणी दिली, तेव्हा ब्रँडने उत्तर दिले, "नाही, त्या असे करणार नाहीत." ही जाहिरात अनेक चाहत्यांनी आलियालाही टॅग केली आहे. सोशल मीडियावर आता या ब्रँडला खूप ट्रोल केले जात आहे. अनेक वापरकर्त्यांनी याला कॉपीराइटचे उल्लंघन म्हटले आहे. एका वापरकर्त्याने लिहिले, "हे पूर्णपणे एआयचे काम आहे, मी हे आलियाला पाठवीन." चाहते हा विषय आलिया आणि तिच्या टीमला सतत टॅग करत आहेत, जेणेकरून या व्यावसायिक फसवणुकीवर कारवाई केली जाईल. दरम्यान, आलियाकडून या विषयावर अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.



# प्रदर्शनापूर्वीच कमाईत किंग!

शाहरुख खानच्या 'किंग' KING चित्रपटाने रिलीजपूर्वीच तब्बल अडीचशे कोटी रुपयांची कमाई केली आहे. या चित्रपटाचे बजेट ४०० कोटी रुपये आहे. 'किंग' प्रदर्शित होण्यापूर्वीच त्याचे अर्ध्याहून अधिक बजेट वसूल झाल्याने या चित्रपटाबद्दल उत्सुकता अधिकच वाढली आहे. हा चित्रपट मोठा इतिहास रचणार असल्याची चर्चा जोरात आहे. चित्रपट वितरण कंपनी 'पेन मरुधर'ने 'किंग' चित्रपटाचे अखिल भारतीय वितरणाचे हक्क २५० कोटी रुपयांना विकत घेतले आहेत. ही या वर्षातील मोठ्या थिएटर डील्सपैकी एक मानली जात आहे. 'एए फिल्म्स', 'जिओ स्टुडिओज', 'पीव्हीआर आयनॉक्स पिक्चर्स', 'यशराज फिल्म्स' आणि 'धर्मा प्रॉडक्शन्स' यांसारख्या कंपन्यांनीही चित्रपटाच्या देशांतर्गत हक्कांसाठी बोली लावली होती. विशेष म्हणजे, 'पेन मरुधर'चे शाहरुख खानच्या प्रॉडक्शन हाऊससोबत जुने संबंध आहेत. कंपनीने यापूर्वी 'जवान', 'डंकी', 'झिरो', 'बदला' आणि 'इत्तेफाक' यांसारख्या चित्रपटांना प्रदर्शित केले आहे. किंगचे दिग्दर्शन सिद्धार्थ आनंद करत आहेत. या चित्रपटाची निर्मिती रेड चिलीज एंटरटेनमेंट आणि मार्फ्लिक्स पिक्चर्स मिळून करत आहेत. 'किंग' यंदा ख्रिसमसदरम्यान प्रदर्शित होणार आहे. 'किंग'च्या रिलीजदरम्यान 'जुमांजी,' 'एव्हेंजर्स : डूम्स डे' आणि 'ड्यून थ्री'सारखे हॉलिवूड चित्रपटदेखील प्रदर्शित होतील. या स्पर्धेमुळे चित्रपटासाठी मोठ्या थिएटर रिलीजचे नियोजन केले जात आहे. चित्रपटात शाहरुखव्यतिरिक्त त्याची मुलगी सुहाना, दीपिका पादुकोण, राणी मुखर्जी, अभिषेक बच्चन, अनिल कपूर, अभय वर्मा आणि अर्शद वारसीदेखील आहेत. 'किंग'ची कथा कठीण परिस्थितीत आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करणाऱ्या एका मार्गदर्शक आणि शिष्याच्या प्रवासावर आधारित आहे.



# 'कॉकटेल 2'मधील कृतिचा ग्लॅमरस अवतार व्हायरल

बॉलीवूड अभिनेत्री कृती सेनन सध्या तिच्या आगामी 'कॉकटेल २' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाच्या रिलीजपूर्वीच कृतीने सोशल मीडियावर आपला ग्लॅमरस अवतार शेअर केला असून त्याने इंटरनेटवर अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. कृती सेननने इन्स्टाग्रामवर काही खास फोटो शेअर केले आहेत. हे फोटो 'कॉकटेल २'च्या शूटिंगदरम्यानचे असून, त्यामध्ये ती 'एली' या तिच्या पात्रात दिसत आहे. या लुकमध्ये ती खूपच बोल्ड आणि स्टायलिश दिसत आहे. तिचा हा अंदाज पाहून चाहत्यांनी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. या फोटोंमध्ये कृतीने एक ग्लॅमरस आउटफिट परिधान केला आहे आणि ती आत्मविश्वासाने पोझ देताना दिसते. विशेष म्हणजे 'जब तलक' या गाण्यातही ती याच लुकमध्ये दिसणार असल्याचं सांगितलं जात आहे. तिच्या या स्टाईल आणि एक्सप्रेशनमुळे गाण्याबद्दलही प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे.



# 2028 ऑलिम्पिकसाठी क्रिकेट मैदानाचे भूमिपूजन

## एका दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या वचनाची पूर्तता

**महाईन्यूज । लॉस एंजेलिस**

**आयसीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजोग गुप्ता यांनी गुरुवारी, 2028 ऑलिम्पिकसाठी उभारल्या जाणाऱ्या क्रिकेट क्रीडांगणाच्या भूमिपूजनाला 'एका दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या वचनाची पूर्तता' असे संबोधले. त्यांनी नमूद केले की, हे क्रीडांगण-जे 'लॉस एंजेलिस नाईट रायडर्स'चे घरचे मैदान म्हणूनही काम करेल.**



या खेळाला जागतिक क्रीडा महोत्सवाच्या (ऑलिम्पिकच्या) मंचावर घेऊन येईल. हा इतिहासातील एक महत्त्वपूर्ण क्षण आहे कारण आज आपण ज्या गोष्टीचे भूमिपूजन करत आहोत, ते केवळ एक क्रिकेटचे मैदान नाही. आपण एका वचनाचे भूमिपूजन करत आहोत. असे वचन, ज्याची पूर्तता होण्यासाठी 128 वर्षे लागली, असे गुप्ता म्हणाले.

लॉस एंजेलिस 2028 ऑलिम्पिकसाठीच्या क्रीडांगणाच्या भूमिपूजन समारंभात गुप्ता बोलत होते. गुप्ता यांनी सांगितले की, एका शतकाहून अधिक काळानंतर ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचे पुनरागमन होणे, हे या खेळाच्या जागतिक लोकप्रियतेची मिळालेली पावती आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने लॉस एंजेलिस क्रीडा स्पर्धेत क्रिकेटचा समावेश करण्यास मंजुरी दिल्यानंतर हे शक्य झाले आहे. जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात लोकप्रिय खेळ जो अडीच अब्जाहून अधिक लोकांकडून खेळला जातो आणि अत्यंत उत्कटतेने पाहिला जातो, तो ऑलिम्पिकच्या मंचावरून इतक्या दीर्घकाळापासून अनुपस्थित होता. जेव्हा आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने लॉस एंजेलिस 2028 क्रीडा स्पर्धेत क्रिकेटच्या समावेशाला औपचारिक मंजुरी दिली.




# अश्विन पंड्यावर भडकला, म्हणाला 'तू MI चा कर्णधार की CSKचा

**महाईन्यूज । मुंबई**

**आयपीएल २०२६ च्या हंगामात वानखेडे स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध (CSK) मिळालेल्या १०३ धावांच्या मानहानीकारक पराभवानंतर मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्या पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. भारताचा माजी फिरकीपटू रवीचंद्रन अश्विनने हार्दिकच्या नेतृत्वावर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले असून, त्याच्या काही रणनीतिक निर्णयांना मुंबईच्या पराभवासाठी जबाबदार धरले आहे.**



### रोहित शर्माची जागा घेण्याचे 'भावनिक ओझे'

हार्दिकच्या कामगिरीवर आणि त्याला मिळणाऱ्या वागणुकीवर बोलताना अश्विनने सहानुभूतीही व्यक्त केली. गुजरात टायटन्सला चॅम्पियन बनवल्यानंतर हार्दिक पुन्हा ट्रेडद्वारे मुंबईत आला आणि त्याला रोहित शर्माच्या जागी कर्णधार बनवण्यात आले. या निर्णयामुळे चाहत्यांनी त्याला प्रचंड ट्रोल केले. अश्विन म्हणाला, "रोहित शर्मासारख्या महान खेळाडूची जागा घेणे आणि स्वतःच्याच घरच्या मैदानावर प्रेक्षकांकडून हुर्यो (BOOING) ऐकणे हे कोणत्याही खेळाडूसाठी मोठे भावनिक ओझे असते. हार्दिकला माहीत आहे की विजय कसा मिळवायचा, पण सध्याची परिस्थिती हाताळणे हे त्याच्यासाठी मोठे आव्हान ठरत आहे."

अश्विनने आपल्या 'अश की बात' या यूट्यूब चॅनेलवर बोलताना हार्दिकच्या निर्णयावर आश्चर्य व्यक्त केले. तो म्हणाला, "हार्दिकच्या निर्णयामुळे मी थोडा निराश झालो आहे. या स्पर्धेत ज्या संघाने प्रथम फलंदाजी केली आहे, त्यांनाच विजय मिळाला आहे, हे माहीत असतानाही हार्दिकने नाणेफेक जिंकून चेन्नईला प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिले. मुंबईने आरसीबीविरुद्धच्या सामन्यातही अशीच चूक केली होती आणि २४० धावांचे लक्ष्य गाठताना त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता."

अश्विनच्या मते, खेळपट्टी दुसऱ्या डावात अधिक संथ होत असताना प्रतिस्पर्ध्याला प्रथम फलंदाजी देणे म्हणजे त्यांना आयती संधी देण्यासारखे होते. चेन्नईकडून संजू सॅमसनने ५४ चेंडूत नाबाद १०१ धावांची खेळी करत मुंबईसमोर २०८ धावांचे लक्ष्य ठेवले, ज्याचा पाठलाग करताना मुंबईचा डाव अवघ्या १०४ धावांत आटोपला.

सामन्याच्या शेवटच्या षटकांत हार्दिकने घेतलेल्या निर्णयावरही अश्विनने कडक शब्दात टीका केली. चेन्नईच्या डावातील शेवटचे षटक नवख्या कृष भगतला देण्याचा निर्णय अश्विनला रुचलेला नाही. "कृष भगतकडे अनुभवाची कमतरता आहे. दुसरीकडे हार्दिकने स्वतः टी-२० विश्वचषकाच्या फायनलमध्ये डेव्हिड मिलर आणि हेनरिक क्लासेन सारख्या फलंदाजांना गोलंदाजी केली आहे. अशा दबावाच्या प्रसंगी कर्णधाराने स्वतः पुढाकार घेऊन गोलंदाजी करायला हवी होती. जास्तीत जास्त काय झाले असते? धावा गेल्या असत्या, पण ती जबाबदारी कर्णधाराची होती," असे अश्विनने नमूद केले. मुंबई इंडियन्स सध्या गुणतालिकेत सात सामन्यांत केवळ चार गुणांसह आठव्या क्रमांकावर फेकली गेली आहे. आता २९ एप्रिल रोजी सनरायझर्स हैदराबादविरुद्ध होणाऱ्या सामन्यात मुंबईचा संघ पुनरागमन करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज ™
ePaper
। शनिवार ।
दि. 25 एप्रिल 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# विनापरवाना फलकांवर महापालिकेची कारवाई

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने शहरातील अनधिकृत आणि विनापरवाना जाहिरात फलकांविरोधात कठोर पाऊल उचलत कारवाई सातत्याने सुरू आहे. या मोहिमेअंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये विनापरवाना उभारण्यात आलेले दोन जाहिरात फलक निष्कासित करण्यात आले आहेत.**



महापालिकेच्या कार्यक्षेत्रात जाहिरात फलक उभारण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४४ व २४५ तसेच महाराष्ट्र शासन जाहिरात नियमन व नियंत्रण ९ मे २०२२ च्या अधिनियमातील तरतुदीनुसार महापालिकेची पूर्व परवानगी घेऊनच खासगी जागेत जाहिरात फलक उभारण्याची तरतूद आहे. या नियमांचे पालन न करता पिंपरी चिंचवड शहरात उभारण्यात आलेले जाहिरात फलक हटवण्याचे काम महापालिकेतर्फे सातत्याने करण्यात येत आहे. या अंतर्गत कातळेवस्ती, एन.डी.एस. बँक्वेट्स लॉन समोर, किवळे येथे उभारण्यात आलेले २० बाय २० आकाराचे दोन तसेच चिंचवड येथील मोरया गोसावी मंदिरासमोर उभारण्यात आलेला १० बाय १० आकाराचा एक जाहिरात फलक निष्कासित करण्यात आला आहे.

तसेच महापालिकेच्या हद्दीतील सर्व जाहिरात एजन्सी, व्यावसायिक आणि संबंधितांना यापुढे कोणतेही विनापरवाना जाहिरात फलक उभारू नयेत. अन्यथा तत्काळ निष्कासनासोबतच नियमान्वये कारवाई करण्यात येईल, अशी माहिती आकाशचिन्ह व परवाना विभागाकडून देण्यात आली आहे.

> शहर नियोजन आणि नागरी शिस्त ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिक व व्यावसायिक यांचीही सामूहिक जबाबदारी आहे. पिंपरी चिंचवड शहर अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि नियोजित ठेवण्यासाठी सर्वांनी नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. विनापरवाना जाहिरात फलकांविरोधातील कारवाई ही केवळ अंमलबजावणी नसून शहराच्या सुव्यवस्थेसाठी घेतलेले ठोस पाऊल आहे.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> पिंपरी चिंचवड शहराचे सौंदर्य, नागरिकांची सुरक्षितता आणि शिस्तबद्ध विकास यासाठी अनधिकृत जाहिरात फलकांना अजिबात थारा दिला जाणार नाही. नियम मोडणाऱ्यांवर यापुढेही सातत्याने कठोर कारवाई सुरू राहील.
>
> **- राजेश आगळे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**




# 'अभिव्यक्ती' कला महोत्सवाची सुरेल पर्वणी!

## नामवंत कलाकारांच्या उपस्थितीत पिंपरी-चिंचवडमध्ये दोन दिवस रंगणार सांस्कृतिक जल्लोष

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात कला, संस्कृती आणि सुरांची एक अविस्मरणीय पर्वणी रंगणार आहे. संस्कार भारती पश्चिम प्रांत पिंपरी चिंचवड समितीच्या वतीने "अभिव्यक्ती – सृजनाच्या आनंदाची कला महोत्सव २०२६" हा भव्य सांस्कृतिक महोत्सव शनिवार व रविवार, दि. २५ व २६ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे ठिकाण ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे असून, रसिकांसाठी हा कार्यक्रम एक सांस्कृतिक मेजवानी ठरणार आहे.**




शनिवारी सकाळी ११ ते १२.३० या वेळेत उद्घाटन समारंभ पार पडणार असून, मंदिर स्थापत्य विषयावर ओजस हिरानी यांचे व्याख्यान होणार आहे. यानंतर नृत्यपंढरी या सत्रात श्रद्धा हर्डीकर शिंदे यांचे कथक नृत्य सादर होईल. डॉ. पं. नंदकिशोर कपोते कथ्थक नृत्य तसेच पं. कैवल्यकुमार गुरव यांचे शास्त्रीय गायन रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहे. दिवसाची सांगता 'संपूर्ण वंदे मातरम्' या देशभक्तीपर सादरीकरणाने होईल. संध्याकाळी रात्री ८ ते २ या वेळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

रविवारी सकाळी १० ते ११ या वेळेत डॉ. भावार्थ देखणे यांचे बहुरूपी भारूड सादर होणार आहे. त्यानंतर रंगमुद्रा थिएटर फाउंडेशन प्रस्तुत 'आठवणींचा गाव' या कार्यक्रमातून महाराष्ट्राच्या लोककलेचे दर्शन घडेल. 'स्वरांजली – आशा भोसले विशेष' या कार्यक्रमात सुरेल गाण्यांची मैफल रंगेल.

रविवारच्या पुढील सत्रात पं. सुधाकर चव्हाण यांचे शास्त्रीय गायन, डॉ. संध्या पुरेचा यांचे भरतनाट्यम नृत्य आणि पद्मश्री पं. रोणू मजुमदार यांचे बासरी वादन हे कार्यक्रम विशेष आकर्षण ठरणार आहेत. रात्री 'त्या तिघी' या सादरीकरणातून स्वातंत्र्यकुंडातील सावरकर घराण्यातील तीन वीरांगनांची गाथा उलगडली जाणार असून, शेवटी 'संपूर्ण वंदे मातरम्'ने महोत्सवाची सांगता होईल. या महोत्सवाचे आयोजन आणि नियोजन लीना आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. तसेच महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे सहकार्य लाभले आहे.

"परंपरा, प्रतिभा आणि सुरांचा सुरेल संगम" अशी ओळख असलेला हा महोत्सव पिंपरी-चिंचवडकरांसाठी कला, संस्कृती आणि सृजनाचा एक अनोखा उत्सव ठरणार आहे. विविध कलाप्रकार, दिग्गज कलाकार आणि सांस्कृतिक वारशाचा संगम अनुभवण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

> "पिंपरी-चिंचवड ही केवळ औद्योगिक नगरी नसून ती समृद्ध कला, संस्कृती आणि परंपरेचीही भूमी आहे. 'अभिव्यक्ती'सारखे महोत्सव आपल्या नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून देतात आणि कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देतात. परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम घडवणारा हा उपक्रम शहराच्या सांस्कृतिक वैभवात निश्चितच भर घालणारा ठरेल.
>
> **– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# क्षमता, आत्मविश्वास ही यशस्वी फार्मासिस्टची गुरुकिल्ली : डॉ. वेदप्रकाश मिश्रा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयामध्ये अंतिम वर्षातील पदविका (डी. फार्मसी), पदवी (बी. फार्मसी) तसेच पदव्युत्तर (एम.फार्मसी) व डॉक्टर ऑफ फार्मसी (फॉर्म. डी) या चारही अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ व पारितोषिक वितरण सोहळा आयोजित केला होता.**




### गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कार

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निरज व्यवहारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे सांगितले की अभ्यासक्रमातील तसेच अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थी उपक्रम एक सक्षम फार्मासिस्ट घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. तसेच, यश मिळवण्यासाठी भक्कम ज्ञान आणि प्रभावी संवाद कौशल्ये अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या समारंभात डी. फार्मसी मधून राधिका चौधरी, बी. फार्मसी मधून ललित निमेकर, तर एम. फार्मसी मधून श्रद्धा भामरे आणि डॉक्टर ऑफ फार्मसी मधून संकेत पालवे यांना "सर्वोत्कृष्ट अंतिम वर्ष विद्यार्थी" पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी शैक्षणिक आणि संशोधनातील उत्कृष्ट कामगिरीसाठी महाविद्यालयाकडून दिला जाणारा "उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार" प्रा. मुकेश मोहिते यांना प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कृष्णा विश्व विद्यापीठ, कराड येथील माननीय कुलगुरूंचे मुख्य सल्लागार तथा दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था, नागपूर येथील उपकुलपती व मुख्य सल्लागार डॉ. वेदप्रकाश मिश्रा उपस्थित होते.

यावेळी बोलताना त्यांनी यशस्वी जीवनासाठी क्षमता,आत्मविश्वास, काळजी आणि अनुकंपा हे चार घटक अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. कमी ध्येय आणि कमी महत्त्वाकांक्षा ठेवणे हा एक प्रकारचा अपराधच आहे, असे सांगून प्रत्येकाने मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी आत्मविश्वास बाळगावा, असे त्यांनी आवाहन केले. भारत हा तरुण आणि तेजस्वी देश असून २१ व्या शतकावर भारताचा पगडा असणार आहे असे नमूद करून "मी करू शकतो" हा विश्वास प्रत्येकाने स्वतःमध्ये निर्माण केला पाहिजे व त्यासाठी वरील चार घटकांचा अवलंब करणे अतिशय आवश्यक आहे असे सांगितले.

संस्थेचे संकुल संचालक रियर ॲडमिरल अमित विक्रम (नि.) यांनी आपल्या भाषणात सांगितले की रुग्णसेवेची कला आणि नैतिक मूल्ये ही फार्मासिस्टसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. "स्वतःपेक्षा सेवा प्रथम" हा दृष्टिकोन स्वीकारण्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फॉर्म डी चा विद्यार्थी श्रीकांत नाईक यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रम समन्वयक डॉ. सारिका निकम यांनी विशेष परिश्रम घेतले आणि प्रा. काजल भगत व प्रा. धनश्री गरुड यांनी विशेष सहाय्य केले.

# महापालिकेकडून मालमत्ता कराची बिले आता थेट घरपोच

## प्रत्येक मालमत्ताधारकापर्यंत कर बिल वेळेत पोहोचविण्याचा उद्देश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मालमत्ता कर बिलांचे घरपोच वाटप महिला बचत गटांच्या माध्यमातून सुरू करण्यात आले आहे. शहरातील प्रत्येक मालमत्ताधारकापर्यंत कर बिल वेळेत पोहोचविण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत असून, बिल वाटपासाठी येणाऱ्या महिलांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापौर रवी लांडगे यांनी केले आहे.**



> पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिकेंद्री सेवेला प्राधान्य देत आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून मालमत्ता कर बिलांचे घरपोच वितरण केल्यामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक मजबूत होतो. ही मोहीम केवळ कर संकलनापुरती मर्यादित नसून महिला सक्षमीकरणालाही चालना देणारी आहे. नागरिकांनी या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देत वेळेत कर भरावा.
>
> – **डॉ. विजय सूर्यवंशी,** आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित सेवा देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून मालमत्ता कर बिलांचे घरपोच वितरण हा त्याच दिशेने उचललेला महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना वेळेत माहिती मिळून कर भरण्याची प्रक्रिया सुलभ होणार आहे, तसेच महिलांना रोजगार आणि आर्थिक सक्षमीकरणाची संधी मिळत आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपला कर वेळेत भरावा.
>
> – **तृप्ती सांडभोर,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

पिंपरी चिंचवड शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र तसेच मोकळ्या जागांसह सुमारे ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मिळकती आहेत. मालमत्ता सर्वेक्षणातून नव्याने सापडलेल्या मिळकतींची नोंदणी सुरू असून, एकूण मिळकतींची संख्या ८ लाखांपर्यंत होण्याची शक्यता आहे. या सर्व मिळकतींच्या कर देयकांचे वितरण महिला बचत गटांमार्फत घरोघरी करण्याची कामकाज महापालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळ यांना दिलेले आहेआहे. गेल्या तीन वर्षांत महिलांनी ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली आहे.

कर आकारणी व कर संकलन विभागाने यावर्षी पर्यंत सर्व देयकांचे वितरण पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. थकबाकीदारांना थकीत रक्कम भरण्याबाबत जप्तीपूर्वीची नोटीस देयकासोबत दिली जाणार असून, त्यामुळे नागरिकांना वेळेत कर भरण्याची संधी उपलब्ध होणार आहे. यासोबतच महिला बचत गटांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन मोबाईल क्रमांक अद्ययावत करणे, करासंदर्भातील माहिती देणे आणि प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करणे अशी कामेही केली जाणार आहेत.

या उपक्रमातून महिला सक्षमीकरणालाही चालना मिळत आहे. समाज विकास विभाग आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'सक्षम' प्रकल्पांतर्गत महिला बचत गट फेडरेशनच्या ६०० हून अधिक महिलांमार्फत ही मोहीम राबवली जात आहे. तसेच, 'सिद्धी' ॲपच्या माध्यमातून मालमत्ताधारकांना घरपोच बिल वितरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या डिजिटल प्रणालीमुळे वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान आणि सुलभ झाली आहे.

# मंदीवर मात : पीसीसीओई जॉब फेअरमध्ये २,२२३ विद्यार्थ्यांना रोजगार!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचलित पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग (पीसीसीओई), निगडी येथे आयोजित "पीसीसीओई जॉब फेअर २०२६" ने रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने उल्लेखनीय यश संपादन करत २,२२३ विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या.**



### 'पंतप्रधान इंटर्नशिप योजनेची माहिती

डॉ. जुमले यांनी सांगितले की, केंद्र सरकारने २०२५-२६ या वर्षात नॅशनल अप्रेंटिस ट्रेनिंग स्कीमअंतर्गत २५० कोटी रुपयांचा निधी प्रशिक्षणार्थींसाठी उपलब्ध करून दिला आहे. पश्चिम विभागात ५,५०० आस्थापनांमार्फत १.५१ लाखांहून अधिक उमेदवारांना अप्रेंटिसशिपची संधी देण्यात आली आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर दिले जाणारे कौशल्य प्रमाणपत्र नोकरीचा अनुभव म्हणून ग्राह्य धरले जाते. उपसंचालक ऋजुता बनकर यांनी 'पंतप्रधान इंटर्नशिप योजना' विषयी माहिती देताना सांगितले की, १८ ते २५ वयोगटातील युवकांना ६ ते ९ महिन्यांच्या कालावधीसाठी इंटर्नशिपची संधी देण्यात येते. या अंतर्गत दरमहा ९,००० रुपयांचे मानधन दिले जाते.

बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग (BOAT), महाराष्ट्र असोसिएशन ऑफ टीपीओ (MATPO) आणि ऑल इंडिया टीपीओ असोसिएशन (AITPO)यांच्या सहकार्याने पार पडलेल्या या मेळाव्यात देशभरातील २०५ नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदवला. एकूण १५,००० हून अधिक रिक्त पदांसाठी ऑनलाईन परीक्षा, गटचर्चा, तांत्रिक मुलाखती आणि वैयक्तिक मुलाखती घेण्यात आल्या.

या उपक्रमासाठी १३,९९१ उमेदवारांनी नोंदणी केली होती. डिप्लोमा, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. या सर्वसमावेशक निवड प्रक्रियेतून २,२२३ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली, अशी माहिती पीसीईटी सेंट्रल प्लेसमेंट सेलचे अधिष्ठाता डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी दिली.

या जॉब फेअरमध्ये कमिन्स इंडिया, पियाजिओ व्हेईकल्स, टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल्स, महिंद्रा अँड महिंद्रा, ह्युंदाई, ॲटलस कॉप्को, भारत इलेक्ट्रॉनिक्स, ईटन, सँडविक, फियाट इंडिया यांसह अनेक आघाडीच्या कंपन्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रतिष्ठित उद्योगांमध्ये करिअर घडविण्याच्या संधी उपलब्ध झाल्या.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन पी. एन. जुमले (संचालक, BOAT) यांच्या हस्ते झाले. यावेळी ऋतुजा बनकर (उपसंचालक, कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालय), एन. एन. वादोडे, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रवंदळे यांनी केले, तर सूत्रसंचालन रोशनी गोडबोले यांनी केले.

या मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राध्यापक, कर्मचारी व २०० हून अधिक विद्यार्थी प्रतिनिधींनी विशेष परिश्रम घेतले.

# भीमाशंकर मंदिर परिसराच्या विकासाला चालना

## वीज उपकेंद्र व सिंचन योजनांवर मुख्यमंत्र्यांशी वळसे पाटील यांची सकारात्मक चर्चा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**२०२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भीमाशंकर मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. या अनुषंगाने माजी सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर आणि सकारात्मक चर्चा केली.**




> “मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे, पिण्याच्या पाण्याची तीव्र समस्या दूर करणे आणि भीमाशंकर तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास करणे ही आमची प्रमुख प्राधान्यक्रमाची कामे आहेत. या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यांनी या सर्व प्रश्नांचे गांभीर्य ओळखून तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विविध योजना राबविणे, पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे आणि भीमाशंकर परिसराचा विकास पर्यटनदृष्ट्या सक्षम करण्यावर भर देण्यात येणार आहे.
> – **दिलीप वळसे-पाटील, माजी सहकार मंत्री.**

या बैठकीत भीमाशंकर परिसराच्या पायाभूत सुविधांचा विकास, वीजपुरवठा, सिंचन योजना तसेच भाविकांसाठी आवश्यक सुविधा यांवर विशेष भर देण्यात आला.

भीमाशंकर परिसरात अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी डिंभे येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. या उपक्रमासाठी जलसंपदा विभागाची सुमारे ६० आर जमीन महावितरणाला हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करून त्यास मंजुरी मिळवण्याची मागणी करण्यात आली आहे. या उपकेंद्रामुळे परिसरातील वीजपुरवठा अधिक स्थिर आणि विश्वासार्ह होणार असून, स्थानिक नागरिक तसेच भाविकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

तसेच कुकडी प्रकल्पांतर्गत तीन नवीन उपसा सिंचन योजनांना मंजुरी मिळालेली असून, त्यासाठी आवश्यक पाणी परवानाही उपलब्ध आहे. या योजनांची सविस्तर अंदाजपत्रके तयार करून संबंधित कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत चर्चेत सकारात्मक भूमिका घेण्यात आली. त्यामुळे शेती क्षेत्राला मोठा आधार मिळणार असून, स्थानिक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील भीमाशंकर व आहुपे खोऱ्यातील गावांना डिंभे धरणातील (हुतात्मा बाबू गेनू जलाशय) पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. या पार्श्वभूमीवर बोरघर-फुलवडे जलउपसा योजनेतून अनुक्रमे ३५८ व २२५ हेक्टर क्षेत्राला पाणी मिळणार आहे. तर कळमजाई उपसा सिंचन योजनेंतर्गत ३४७० अश्वशक्तीच्या पंपांच्या साहाय्याने ३९७ मीटर उंचीवर पाणी उचलून सुमारे १००२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. या योजनेचा लाभ गोहे खुर्द, गोहे बुद्रुक, राजेवाडी, पोखरी, चिखली, जांभोरी, नांदुरकीचवाडी, फलोदे, तळेघर, राजपूर, गाडेवाडी, तेरुंगण व निगडाळे अशा १६ गावांना होणार आहे. दरम्यान, २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथेही मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी अपेक्षित आहे. हे लक्षात घेऊन भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुमारे २८८.१७ कोटी रुपयांच्या विस्तृत विकास आराखड्याला मान्यता देण्यात आली असून, त्या अनुषंगाने विविध विकासकामे वेगाने सुरू आहेत. या सर्व उपक्रमांमुळे भीमाशंकर परिसराचा विकास वेगाने होऊन धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार आहे, तसेच स्थानिक नागरिकांच्या जीवनमानातही लक्षणीय सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भामा-आसखेड धरण साठयात गतवर्षीपेक्षा वाढ, तरीही उन्हाळी नियोजन गरजेचे

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**भामा-आसखेड धरण मध्ये सध्या ५२.५३ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून, तो गतवर्षीच्या तुलनेत सुमारे १९ टक्क्यांनी अधिक असल्याची दिलासादायक माहिती समोर आली आहे. यामुळे परिसरातील शेती, पिण्याच्या पाणीपुरवठा योजना आणि जनावरांसाठी पाण्याची उपलब्धता काही प्रमाणात सुरक्षित झाली आहे.**



मात्र, वाढत्या उन्हाची तीव्रता लक्षात घेता उपलब्ध पाण्याचा काटेकोर आणि शाश्वत वापर करणे अत्यावश्यक असल्याचे मत धरण प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आले आहे.

धरण प्रशासनाचे अधिकारी नीलेश घारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या धरणात सुमारे ४.५० टीएमसी इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. हा साठा समाधानकारक असला, तरी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर त्याचे नियोजनपूर्वक व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. यंदाच्या हंगामात पाण्याचे आवर्तन टप्प्याटप्प्याने सोडण्यात आले आहे. रब्बी हंगामातील पहिले आवर्तन २१ ते २५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान १००० क्युसेक्स वेगाने सोडण्यात आले होते. त्यानंतर १४ ते २५ मार्चदरम्यान पहिले उन्हाळी आवर्तनही १००० क्युसेक्सने सोडण्यात आले. पुढे ७ ते १४ एप्रिलदरम्यान दुसरे उन्हाळी आवर्तन ६०० ते १००० क्युसेक्स दरम्यान नियोजनपूर्वक सोडण्यात आले. या नियोजनबद्ध पाणीसोडीमुळे खेड, शिरूर, दौंड आणि हवेली या चार तालुक्यांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. भामा आणि भीमा नदीवरील एकूण १८ बंधाऱ्यांमार्फत या पाण्याचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात आला आहे. विशेषतः आसखेड धरणापासून दौंड तालुक्यातील आलेगावपागापर्यंतच्या परिसरात रब्बी पिके, फळबागा, भाजीपाला उत्पादन आणि पिण्याच्या पाणी योजनांना या पाण्याचा मोठा फायदा झाला आहे. यामुळे शेती उत्पादन टिकवून ठेवण्यास मदत झाली असून, ग्रामीण भागातील पाणीटंचाईचा ताण काही प्रमाणात कमी झाला आहे.

भामा-आसखेड हे ८.१४ टीएमसी क्षमतेचे मातीचे धरण असून, पुणे जिल्ह्यातील शेती आणि पाणीपुरवठ्यासाठी ते अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. सध्या उपलब्ध पाणीसाठा चांगला असला, तरी आगामी काळात उन्हाची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता लक्षात घेता पाण्याचा अपव्यय टाळणे आणि नियोजनबद्ध वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने शेतकऱ्यांना पाण्याचा संयमित वापर करण्याचे आवाहन केले असून, भविष्यातील संभाव्य टंचाई टाळण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

> “या पाण्यामुळे नदीकाठच्या गावांतील शेती, जनावरे आणि पाणीपुरवठा योजनांना दिलासा मिळाला आहे. सध्या धरणाची पाण्याची पातळी ६६३.६७ मीटर असून, एकूण साठा १२७.५८१ दलघमी, तर उपयुक्त साठा ११४.०५१ दलघमी इतका आहे. भामा-आसखेड हे ८.१४ टीएमसी क्षमतेचे मातीचे धरण असून, या आकडेवारीवरून सध्याची स्थिती समाधानकारक असल्याचे दिसून येते. तरी पुढील काळातील उष्णतेचा विचार करता पाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.
> – **अश्विन पवार,**
> **उपविभागीय सहायक अभियंता**